अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,
एस.आर.ए.बिल्डींग, ए-विंग, दुसरा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रे (पूर्व), मुंबई-400 051.
फोन व फॅक्स-022 26591586, Email:-ccfmangrove@mahaforest.gov.in/ccfmmumbai@gmail.com

विषय :- कोकण विभागातील वेटलँड संदर्भात
पाणथळ तक्रार निवारण समितीची
बैठकीचे इतिवृत्त.

जा.क्र.उप.व/कांकमुं/इतिवृत्त/ 46 /२०१७-१८
वांद्रे.५१, दिनांक :- 15 /०९/२०१७

प्रति,

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी. संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
५. संचालक पर्यावरण विभाग.
६. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
७. महानगर पालिका आयुक्त / सह आयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
८. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
१०. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
११. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

उपरोक्त विषयान्वये कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची ८ वी बैठक दि. 20/07/2017 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर येथील कार्यालय येथे घेण्यात आली. सदर बैठकीचे मंजुर इतिवृत्त माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीत सादर करावा ही विनंती.

सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई

**विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार समितीची 8 वी मासिक बैठक.**

**दिनांक 20.07.2017**

**स्थळ :- मुंबई जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर**

विभागीय आयुक्त कोकण विभाग यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे डॉ. भाऊसाहेब दांगडे, उपआयुक्त (महसुल) कोकण विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि. 20.07.2017 रोजी कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची सभा आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीस खालील अधिकारी व व्यक्ति उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | कार्यालय | पद |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. भाऊसाहेब दांगडे | विभागीय आयुक्त, कोकण भवन, नवी मुंबई. | उपआयुक्त |
| 2 | डॉ. प्रशांत नारनवरे | जिल्हाधिकारी, पालघर | जिल्हाधिकारी, पालघर |
| 3 | श्री. जयरामेगौडा आर. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई | उपवनसंरक्षक |
| 4 | श्री. भरत शितोळे | जिल्हाधिकारी रायगड | उपविभागीय अधिकारी |
| 5 | श्री. नितीन महाजन | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर | निवासी उपजिल्हाधिकारी |
| 6 | श्री. विजय जोशी | जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग | निवासी उपजिल्हाधिकारी |
| 7 | श्री. सुरेश पवार | कल्याण डोंबिवली महानगरपालिका | उपायुक्त |
| 8 | श्री. रविंद्र भोसले | ठाणे पोलिस आयुक्तालय | सहाय्यक पोलिस आयुक्त |
| 9 | श्री. ओमप्रकाश दिवटे | ठाणे महानगरपालिका | उपायुक्त |
| 10 | श्री. संजय हेखाडे | वसई विरार महानगरपालिका | अति. आयुक्त |
| 11 | श्री. बी.डी.शिंदे | पोलिस अधिक्षक | PSI |
| 12 | श्री. स्टॅलिन डी. | वनशक्ती | संचालक |
| 13 | श्री. हिमांशु राऊत | वसई विरार शहर महानगरपालिका | कनिष्ठ अभियंता |
| 14 | श्री. राजीव नायक | नमक विभाग | उपनमक अधीक्षक |
| 15 | श्री. पी.बी.चव्हाण | अधिक्षक मुंबई यांचे कार्यालय | सहाय्यक अधिक्षक |
| 16 | श्री. टेंगळे | कल्याण डोंबिवली महानगरपालिका | नगररचनाकार |
| 17 | श्री. आर एल.ठाकरे | उल्हासनगर पालिका | शाखा अभियंता |
| 18 | श्री. के.के.भदावे | तहसिलदार, ठाणे | तहसिलदार, ठाणे |
| 19 | श्री. सुरेश कदम | पोलिस निरीक्षक, रत्नागिरी | पोलिस अधिक्षक, रत्नागिरी |
| 20 | श्री. अनिल जी. टोम्पे | पोलिस निरीक्षक, ठाणे ग्रामीण | पोलिस अधिक्षक, ठाणे ग्रामीण |
| 21 | श्री. नामदेव बंडगर | पोलिस निरीक्षक, रायगड | पोलिस निरीक्षक, रायगड |
| 22 | श्री. प्रशांत पानवेलकर | जिल्हाधिकारी, रत्नागिरी | तहसीलदार मंडणगड |
| 23 | श्री. मनिषा चौधरी | ठाणे महानगरपालिका | प्रदुषण नियंत्रण अधिकारी |
| 24 | श्री. लहु चौधरी | मिरा भाईंदर महानगरपालिका | लिपीक |

सदस्य सचिव यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले आणि सभेला सुरुवात केली.

| अ.क्र. | मुद्दा | करावयाची कारवाई | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| 1 | मागील मंजुर इतिवृत्तांमधील प्राप्त तक्रारी अर्ज आणि जनजागृती संदर्भात अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल. | 1) श्री. अनिकेत सतिश वाडीवकर :-<br>श्री. अनिकेत सतिश वाडीवकर यांची मौजे आगाशी, ता. वसई जि. पालघर येथील सर्वे नं. 233, हिस्सा क्र. 1/अ, या जागेतील पाणथळ क्षेत्रावर अतिक्रमणासंदर्भात तक्रार प्राप्त झालेली होती. सदर तक्रारीसंदर्भात तहसिलदार वसई यांनी दिलेल्या माहितीनुसार 7/12 धारकांपैकी कोणी भराव केला ते तपासुन गुन्हा दाखल करण्याबाबत पोलिस स्टेशन अर्नाळा येथे कळविण्यात आले आहे. तसेच दिनांक 20/06/2017 रोजी निवासी नायब तहसिलदार यांच्याकडील पथकाकडुन स्थळपाहणी करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने उपअधिक्षक भुमी अभिलेख वसई यांच्याकडुन अहवाल प्राप्त झालेला आहे. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी दाखविलेला मातीचा भराव दिसुन येतो. सदर जमिन मालकावर मातीचा भराव केल्याबाबत रु. 18,28,000/- इतक्या रकमेची दंडात्मक नोटीस निर्गमित करण्यात आलेली आहे. तसेच वनविभागामार्फत कांदळवनाची झाडे उपलब्ध झाल्यानंतर सदर ठिकाणी झाडांची लागवड करण्यात येणार आहे अशी माहिती तहसिलदार वसई यांनी दिली, त्यानुसार मा. अध्यक्ष यांनी तक्रारीसंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा तपशील तातडीने सादर करावा तसेच वनविभागाने कांदळवन लागवड करुन त्यासाठीचा खर्च संबंधीत जमिन धारकाकडुन RRC स्वरुपात वसुली करावी अशा सुचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. | जिल्हाधिकारी पालघर, उपवनसंरक्षक ठाणे. |
| | | 2) श्री. विवेकानंद गुप्ता :-<br>मा. आयुक्त यांनी निवासी उपजिल्हाधिकारी यांना सदर तक्रारी संदर्भात सुचना दिल्या की, नमुद तक्रारीला बराच काळ गेला असुन त्यासंबंधीत तक्रारीचा लवकरात लवकर पाठपुरावा, चौकशी करुन केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करावा. तसेच प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी सदर बैठकीचे सदस्य असुन आजपर्यंत झालेल्या कोणत्याही बैठकीमध्ये उपस्थित राहिले नाही. त्यामुळे मा. अध्यक्ष यांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातील सदस्य सचिव यांना त्यांच्या येथील एका सक्षम प्रतिनिधीला बैठकीमध्ये सातत्याने हजर होणेबाबत अर्धशासकीय पत्र देण्याचे आदेश दिले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व संबंधित यंत्रणा, सदस्य सचिव. |
| | | 3) श्री. धीरज परब :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने सदर बैठकीमध्ये प्रतिनिधी म्हणुन एक लिपीक उपस्थित राहीले होते. परंतु तक्रारीच्या संदर्भात ते कोणत्याही प्रकारची माहिती देऊ शकले नाही, त्याबाबत मा. अध्यक्ष यांनी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना पुढील बैठकीत संबंधित प्रतिनिधींनी सविस्तर माहितीसह उपस्थित रहावे असे पत्र पाठविण्यास सांगितले. | उपायुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 4) श्री. कुलदीप चौधरी :-<br>श्री. कुलदीप चौधरी यांची नायगाव (प) ता. वसई जि. पालघर येथील कांदळवनावर भरणी करुन सुमारे 1 एकर क्षेत्रावरील कांदळवने नष्ट केल्याची तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तलाठी सजा वडवली यांनी आरोपींविरुध्द मणिकपुर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल केलेला होता. सदर ठिकाणी झालेला भराव निष्कासित करुन वेटलँड जमिन पुर्ववत करणेसाठी वसई विरार महानगरपालिका, पोलीस कर्मचारी, तलाठी मंडळ अधिकारी यांचेसह दि. 20/06/2017 रोजी कारवाई करणेबाबत कळविणेत आले होते. सदरचे पथक कार्यवाहीस्त्व गेले असता तेथे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाल्याने दि. 23/06/2017 रोजी कारवाई करण्यात येणार होती, परंतु कारवाईच्या वेळी पोलिस बंदोबस्त उपलब्ध नसल्याने व त्या दिवशी पाऊस व चिखलाचे प्रमाण जास्त असल्याने जे.सी.बी. ने पुढील कारवाई करता आली नाही. याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी यांची तहसिल कार्यालय वसई येथे दि. 17/07/2017 रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये ज्या ठिकाणी कांदळवनाची तोड व ऱ्हास झालेला आहे त्या ठिकाणी नव्याने झाडे लावण्याबाबत सुचना देण्यात आल्या. तसेच वनविभागामार्फत कांदळवनाची झाडे उपलब्ध झाल्यानंतर त्यांची लागवड करुन येणारा खर्च जमिनमालक यांच्याकडुन वसुल करण्यात येईल, मौजे उमेळी येथील सर्वे क्र. 60/1 व 60/2 मध्ये 400 ब्रास माती व 20 ब्रास दगड भराव केल्याबाबत दंडात्मक नोटीस निर्गमित करण्यात आलेली आहे अशी माहिती तहसिलदार वसई यांनी अध्यक्षांना दिली. | जिल्हाधिकारी पालघर, आयुक्त वसई विरार महानगरपालिका. |
| | | 5) श्री. रोहित जोशी:- रोहीत जोशी ठाणे यांनी स्वामी समर्थ मठ कोपरी ठाणे (पु) येथील कांदळवनावर भरणी करुन कांदळवन नष्ट केल्याबाबत तक्रार केली होती. सदर तक्रारीसंदर्भात ठाणे महानगरपालिकेने जागा मालक श्री. चेतन रमेश तांडेल व इतर यांच्यावर गुन्हा दाखल करण्याबाबत कोपरी पोलिस विभागाला कळविण्यात आलेले आहे. श्री. चेतन रमेश तांडेल यांनी काही प्रमाणात डेब्रीजचे उंच ढिगारे काढले असुन उर्वरित डेब्रीज काढण्याचे काम सुरु आहे अशी माहिती उपायुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी दिली. मा. अध्यक्ष यांनी डेब्रीज काढुन त्याठिकाणी कांदळवन पुर्नस्थापित करण्याचे आदेश दिले व डेब्रिज जागावर होणारे खर्च हा जमीनमालक व दोषीविरुध्द कारवाई करुन त्यांना दंडात्मक नोटीस देऊन दंडाची वसुली करण्याची सुचना संबंधित यंत्रणेला दिली आहे. | जिल्हाधिकारी ठाणे, आयुक्त ठाणे महानगरपालिका |
| | | 6) श्री. हरीश पांडे :-<br>श्री. हरीश पांडे, मुक्काम दहिसर (प), मुंबई यांनी मढ मार्वे रोड, मार्वे गाव, ता. बोरिवली येथील कांदळवन बृहन्मुंबई महानगरपालिका व INS हमलाच्या | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अधिकाऱ्यांनी नष्ट केल्याची तक्रार केली होती. सदर प्रकरणाची चौकशी झाली असल्याचे व चौकशीबाबतचा अंतिम अहवाल सात दिवसाच्या आत लेखी स्वरुपात समितीसमोर सादर करण्यात येईल अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी मा. अध्यक्ष यांना दिली. | |
| | | 7) श्री. फ्रान्सिस डिसोजा :-<br>श्री फ्रान्सिस डिसोजा, अध्यक्ष हरित नैसर्गिक वैभव बचाव अभियान यांनी भुईगाव येथील मौजे विभागातील पाणथळ जागेवर अतिक्रमणाबाबत व कांदळवन वाचविण्याबाबत तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीबाबत जिल्हाधिकारी पालघर व उपायुक्त वसई विरार महानगरपालिका यांचे प्रतिनिधी यांनी तेथील सर्वे क्र. 220 मध्ये मे 2016 च्या दरम्यान श्री. रेमंड रॉय करवाला यांच्या विरुध्दात कांदळवनाची तोड व भराव केल्याबाबत पोलीस स्टेशन वसई येथे गुन्हा दाखल केलेला आहे. तसेच अनधिकृतपणे 41.16 ब्रास माती भराव केल्याबाबत रु. 98,784/- इतक्या दंडात्मक रकमेची नोटीस निर्गमित करण्यात आलेली आहे त्या अनुषंगाने भरावधारक यांनी खुलासा व निर्गत परवाने सादर केले आहे. तसेच अनधिकृत बांधकामाबाबत तहसीलदार वसई यांचे नोटीशीचे विरुध्द श्री. ललीत सखाराम म्हात्रे यांनी अतिक्रमण तोडु नये म्हणुन मा. दिवाणी न्यायालयात वरीष्ठ स्तर वसई यांचे न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्यात मा. न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. परंतु स्थगिती उठविणेत यावी यासाठी उपविभागीय अधिकारी वसई यांनी मा. न्यायालयास विनंतीपर पत्र दि. 12/06/2017 दिलेले आहे. सुनावणीची पुढील तारीख 04/08/2017 अशी आहे. याप्रकरणी कांदळवनाची तोड झाली नाही अशी माहिती तहसिलदार वसई यांनी दिली. | जिल्हाधिकारी पालघर, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 8) श्री. अनंत दत्तात्रय पाटील :- श्री अनंत दत्तात्रय पाटील यांनी भुईगाव येथील मौजे विभागातील पाणथळ जागेवर अतिक्रमणाबाबत व कांदळवन वाचविण्याबाबत तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीबाबत जिल्हाधिकारी पालघर व उपायुक्त वसई विरार महानगरपालिका यांचे प्रतिनिधी यांनी तेथील सर्वे क्र. 220 मध्ये मे 2016 च्या दरम्यान श्री. रेमंड रॉय करवाला यांच्या विरुध्दात कांदळवनाची तोड व भराव केल्याबाबत पोलीस स्टेशन वसई येथे गुन्हा दाखल केलेला आहे. तसेच अनधिकृतपणे 41.16 ब्रास माती भराव केल्याबाबत रु. 98,784/- इतक्या दंडात्मक रकमेची नोटीस निर्गमित करण्यात आलेली आहे त्या अनुषंगाने भरावधारक यांनी खुलासा व निर्गत परवाने सादर केले आहे. तसेच अनधिकृत बांधकामाबाबत तहसीलदार वसई यांचे नोटीशीचे विरुध्द श्री. ललीत सखाराम म्हात्रे यांनी अतिक्रमण तोडु नये म्हणुन मा. दिवाणी न्यायालयात वरीष्ठ स्तर वसई यांचे न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्यात मा. न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. परंतु स्थगिती उठविणेत यावी यासाठी उपविभागीय अधिकारी वसई यांनी मा. न्यायालयास विनंतीपर पत्र दि. 12/06/2017 दिलेले आहे. सुनावणीची पुढील तारीख 04/08/2017 अशी आहे. याप्रकरणी कांदळवनाची तोड झाली नाही अशी माहिती तहसिलदार वसई यांनी दिली. | जिल्हाधिकारी पालघर. |
| | | 9) श्री. मॅकेन्झी डाबरे :-<br>श्री. मॅकेन्झी डाबरे यांची मौजे भुईगाव बु.स.नं 220 पै या शासकीय खांजन जमीनीवर श्री. लुक आगोस्तीन लुजबो रा. गिरीज हे 2 ट्रॅक्टर व पोकलँडच्या सहाय्याने अनधिकृत तलाव खोदकाम करीत असलेबाबत तक्रार प्राप्त झालेली असुन तक्रारदार यांनी संबंधित आरोपी विरुध्द गुन्हा दाखल केलेला होता. तसेच श्री. जगदिश मेहेर व इतर पदाधिकारी यांनी अनधिकृत गौणखनिज उत्खनन करुन त्यालगतच्या तिवरांच्या लहान झाडांना जाळून पर्यावरणाचा ऱ्हास केला म्हणून तलाठी सजा निर्मळ यांनी त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन वसई येथे 27/04/2017 रोजी गुन्हा दाखल केलेला आहे. मौजे भुईगाव येथील सर्वे क्रमांक 220 मध्ये अनधिकृतपणे 1025 ब्रास व 255.75 ब्रास माती भराव केल्याबाबत अनुक्रमे रु. 24,60,000/- व रु 6,13,800/- इतक्या दंडात्मक रकमेची नोटीस निर्गमित करण्यात आली आहे अशी माहिती तहसिलदार वसई यांनी दिली. | जिल्हाधिकारी पालघर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 10) श्री. स्टॅलिन डी :- स्टॅलिन डी यांनी मौजे आघाशी ता. वसई जि. पालघर येथे सुमारे 10 एकर पाणथळ क्षेत्र नष्ट केल्याची तक्रार केली होती. दिनांक 20/06/2017 रोजी निवासी नायब तहसिलदार यांच्याकडील पथकाकडुन पुन्हा स्थळपाहणी करण्यात आलेली होती. याबाबत भुमापन सदरचा भरावमोजनी केलेल्या मापनानुसार दिसुन येते. त्या अनुषंगाने उपअधिक्षक भुमी अभिलेख वसई यांच्याकडुन अहवाल प्राप्त झालेला आहे. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी दाखविलेला मातीचा भराव दिसुन येतो. सदर तक्रारीसंदर्भात तहसिलदार वसई यांनी दिलेल्या माहितीनुसार 7/12 धारकांपैकी त्या जमिनीवर कोणी भराव केला ते तपासुन गुन्हा दाखल करण्याबाबत पोलिस स्टेशन अर्नाळा येथे कळविण्यात आले आहे. सदर मातीचा भराव केल्याबाबत रु. 18,28,000/- इतक्या रकमेची दंडात्मक नोटीस निर्गमित करण्यात आलेली आहे तसेच वनविभागामार्फत कांदळवनाची झाडे उपलब्ध झाल्यानंतर त्याची लागवड करणार आहे, त्यासाठी येणारा संपुर्ण खर्च व पुर्ण दंड हा जमीनमालक यांच्याकडून वसूल करण्यात येईल अशी माहिती तहसिलदार वसई यांनी दिली. | जिल्हाधिकारी पालघर |
| | | 11) New Link Road Residence Forum, Dahisar West यांनी गोराई खाडी मध्ये भराव करणे तसेच पॅन इंडिया पर्यटन लि. यांनी सुमारे 15 एकर क्षेत्रावर कांदळवन नष्ट करणे याबाबत तक्रार केलेली होती. सदर विषयासंदर्भात चौकशी अजुन चालु आहे आणि त्यासाठी अजुन थोडा वेळ लागेल अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी मा. अध्यक्ष यांनी दिली. मा. अध्यक्ष यांनी संबंधित चौकशीबाबतचा अंतर्गत अहवाल (Interim Report) पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरुपात समितीसमोर सादर करावा अशी सुचना निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना दिली. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर |
| | | 12) धीरज परब:- श्री. धीरज परब यांनी भाईंदर पुर्व येथील सरस्वती नगर, साईबाबा नगर, INP Park व जैन नगर येथील कांदळवन/पाणथळ/CRZ 1 मधील प्रतिबंधीत क्षेत्रात मोठया प्रमाणावर भराव करुन बांधकामे केल्याची तक्रार केली होती. सदर तक्रारीसंदर्भात मीरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडुन अहवाल प्राप्त् झालेला आहे. त्या अहवालामध्ये साईबाबा नगर मागील सचिन तेंडुलकर मैदान हे महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तयार केले असुन तेथे करण्यात येत असलेली विविध विकासकामे ही महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असुन सदर ठिकाणी कांदळवनावर माती भराव टाकण्याचे दिसुन येत नाही असे नमुद केले आहे. | मिरा भाईंदर महानगरपालिका. |
| 2 | पाणथळ ऱ्हासा संदर्भात नवीन प्राप्त तक्रारींचा आढावा. | 1. श्री. नंदकुमार पवार :- नंदकुमार पवार यांनी मौजे बाळकुम, कशेळी, काल्हेर, अंजूर दिवा जि. ठाणे येथील पाणथळ क्षेत्र नष्ट केल्याची तक्रार केली होती. SDO Thane यांनी स्वत: स्थळपाहणी केली आहे आणि त्यासंबंधी कारवाई केलेला अहवाल समिती समोर सादर | जिल्हाधिकारी ठाणे, आयुक्त ठाणे महानगरपालिका. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करणार आहे असे बैठकीमध्ये सांगितले. सदर तक्रारीसंदर्भात उपआयुक्त (प्रदुषण नियंत्रण कक्ष) ठाणे महानगरपालिका यांनी कांदळवन भुमीवर बांधकाम व्यवसायीकाद्वारे डेब्रीज खारफुटी झुडपे नष्ट करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे संबंधित बांधकाम व्यवसयायिकावर स्थानिक पोलिस स्टेशनमध्ये महाराष्ट्र सागरी मंडळ यांनी गुन्हा दाखल केलेला आहे. SDO ने स्थळपाहणी केल्यानंतरही Reclamation चालु आहे अशी माहिती समिती सदस्य श्री. दयानंद स्टॅलिन यांनी समितीच्या निदर्शनास आणुन दिले. संबंधीत पोलिसांनी सदर विषयासंबंधी Reclamation stop करावे व SDO ने त्याबाबत पुढील तपासणी करावी अशी सुचना मा. अध्यक्ष यांनी दिली. | |
| | | 2. श्री. दिलीप मुकुंद पाटील :- दिलीप मुकुंद पाटील यांनी मौजे ससुनवघर जि. पालघर येथील पाणथळ क्षेत्र नष्ट केल्याची तक्रार केली होती. सदर तक्रारीसंदर्भात स्थळपाहणीचा अहवाल प्राप्त होताच पुढील कारवाई करण्यात येईल असे तहसिलदार वसई यांनी सांगितले. | जिल्हाधिकारी पालघर, आयुक्त महानगरपालिका. |
| | | 3. श्री. ऑल्विन विन्सेंट रॉड्रीग्ज :- :- ऑल्विन विन्सेंट रॉड्रीग्ज यांनी मौजे बोळीज विरार (प) जि. पालघर येथील भात शेतीच्या पाणथळ क्षेत्रात अनधिकृत भरावाबाबत तक्रार प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीसंदर्भात समिती सदस्य श्री दयानंद स्टॅलिन यांनी खारलँड बंड काढुन टाकण्याचा सल्ला दिला. जर खारलँड बंड काढुन टाकले तर अनधिकृत होणारी बांधकामे कमी होतील. हया सर्व विषयांवर चर्चा करण्यासाठी समितीने मीठ विभाग यांची मदत घेण्याचे ठरविले व पुढील बैठकीमध्ये मीठ विभागातील सक्षम अधिकाऱ्याला बोलवा असे आदेश दिले. | जिल्हाधिकारी पालघर, आयुक्त वसई विरार महानगरपालिका, सदस्य सचिव. |
| | | 4. श्री. धीरज परब:- श्री. धीरज परब यांनी मौजे वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग पाणथळ क्षेत्रात अनधिकृत भराव करुन कांदळवन नष्ट केल्याची तक्रार केली होती. तक्रारीसंदर्भात रॅम्प बनविण्याचे काम चालु असुन ते काम करीत असताना शासनाची मान्यता घेण्यात आलेली आहे. तसेच रॅम्प तयार करीत असताना कुठल्याही प्रकारचे कांदळवन तोड झालेले नाही असे निवासी उपजिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांनी सागितले. सदर तक्रार ही समितीने मान्य केली व ही तक्रार बंद करण्याचा निर्णय मा. अध्यक्ष यांनी घेतला. | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग |
| | | 5. श्री. धीरज परब:- श्री. धीरज परब यांच्या वेटलँड ऱ्हासासंदर्भात एकुण 6 तक्रारी कांदळवन कक्ष, मुंबई या कार्यालयात प्राप्त झालेल्या होत्या. सदर तक्रारीसंदर्भात संबंधीत यंत्रणेने स्थळपाहणी केली असुन त्याचा अहवाल पंधरा दिवसांच्या आत सादर प्राप्त होईल असे सांगितले. | जिल्हाधिकारी पालघर, ठाणे, उपआयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका, वसई विरार महानगरपालिका. |
| 3 | अध्यक्षांनी बैठकीच्या विषयाव्यतिरिक्त पुढील विषयांवर चर्चा केली. | 1. अनधिकृत बांधकाम थाबविण्यासाठी जिल्हाधिकारी पालघर यांनी समितीला एक सल्ला दिला. त्यामध्ये तालुका स्तरावर एक समिती स्थापन करा. त्या समितीमध्ये महानगरपालिका, पोलिस विभाग, वनविभाग, | संबंधित जिल्हाधिकारी, सदस्य सचिव. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | Land Record, PWD विभागाचे सक्षम प्रतिनिधी यांचा समावेश असावा. या सर्वांनी मिळून सर्वे करावा. सर्वेच्या वेळी जर काही दुरुस्ती करायची असेल तर त्या संबंधी सक्षम अधिकाऱ्यासोबत चर्चा करुन ते दुरुस्त् करुन घ्यावे. जर डंपिंग झाले असेल तर महानगरपालिकेचे Civil Engineer नी मिळुन एकुण किती डेब्रीज काढले व ते काढण्यासाठी किती खर्च आला याचे एक estimate तयार करावे व तसेच Plantation साठी किती खर्च येईल याचे एक estimate वनविभागाने करावे व त्या दोन्ही खर्चाचे मिळुन एक estimate तयार करुन् एकत्र दंड आकारण्यात येईल व त्याची वसुली करण्यात येईल. जर ती जागा खाजगी मालकीची असेल तर जमिन मालकाला खर्च करावा लागेल. जर जमिनमालक दंड देण्यासाठी तयार नसेल तर त्याची जमिन जप्त करण्यात येईल. तसेच शासकीय जमिन वरील डेब्रीजचे Removal महानगरपालिकेकडुन करुन घ्यावे व त्यासाठी लागणारा खर्च Offenders कडून आकारण्यात येईल असे आदेश देण्यात आले. | |
| | | 2. Brief Document तयार करणेबाबत :- मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार 2.25 हेक्टर पेक्षा जास्त् वेटलॅंड असतील तर ते निश्चित करुन Brief Document तयार करावे हयाबाबत चर्चा झाली. समितीचे सदस्य सचिव, यांनी National Wetland Inventory and Assessment Report बद्दल Presentation दिले. तसेच inventory grid sheet सगळयांना दिली. Grid sheet प्रमाणे Brief document तयार करावे असे समितीने संबंधित यंत्रणेला सांगितले. महाराष्ट्रातील सगळे वेटलॅंडचे geo coordinates मिळविण्याबाबत SAC and MRSAC ला पत्र लिहणार आहे अशी माहिती सदस्य सचिव यांनी बैठकीत दिली. | |
| | | 3. Website design :- Website Designer ने वेबसाईटच्या Flow and Content विषयी सर्व समिती सदस्यांना डेमो दिला. नंतर सदस्य सचिव यांनी सर्व सभासदांना वेबसाईट विषयी त्यांचे अभिप्राय ई-मेल व्दारे पाठविण्याची विनंती केली, जेणेकरुन त्यामध्ये काही सुधारणा करायची असेल तर ती आपण करु शकतो. | |

सदर सभेस उपस्थित असणाऱ्या सदस्यांचे आभार मानुन बैठक संपल्याचे सचिवांकडुन जाहिर करण्यात आले.

अध्यक्ष

कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती

तथा

विभागीय आयुक्त, कोकण विभाग.